RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक १७] शुक्रवार, फेब्रुवारी २, २०२४/माघ १३, शके १९४५ [पृष्ठे ७, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५४**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ फेब्रुवारी २०२४.

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०२३/अनौ.सं.क्र.२०/प्र.क्र. ६०२/म-१ (धोरण).—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक आयटीपी-२०२१/प्र.क्र. १७०/उद्योग-२, दिनांक २७ जून २०२३ याद्वारे महाराष्ट्र राज्य नवीन माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण, २०२३ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त आयटी/आयटीइएस धोरण-२०२३" असा केला आहे) घोषित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त धोरणाअन्वये, महाराष्ट्र शासनाने, उक्त आयटी/ आयटीइएस धोरण, २०२३ यामध्ये नमूद केल्याप्रमाणे, माहिती तंत्रज्ञान किंवा माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा, ॲनिमेशन, दृश्य प्रभाव, खेळ/(गेमिंग) व चित्रकथा (कॉमिक्स) (एव्हीजीसी) युनिटे, आधारसामग्री केंद्रे व उदयोन्मुख तंत्रज्ञान युनिटे (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त आयटी /आयटीईएस युनिट" असा केला आहे) यांच्याशी संबंधित असलेली नवीन व विस्तारित किंवा वैविध्यपूर्ण पात्र युनिटे किंवा प्रकल्पयांसाठी, इतर गोष्टींबरोबरच, मुद्रांक शुल्काच्या संपूर्ण किंवा अंशतः माफीच्या स्वरूपात वित्तीय प्रोत्साहन देण्याचे घोषित केले आहे.

त्याअर्थी आता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, जनहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याची खात्री पटल्याने, याद्वारे, दिनांक २७ जून, २०२३ पासून सुरू होणाऱ्या व दिनांक २६ जून, २०२८ रोजी संपणाऱ्या (दोन्ही दिवस धरून) कालावधीसाठी किंवा उक्त आयटी/ आयटीइएस धोरण प्रचलित असणाऱ्या कालावधीसाठी, उक्त आयटी/आयटीइएस धोरण, २०२३ अनुसार, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-एक च्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या युनिटांच्या किंवा प्रकल्पांच्या पात्र वर्गवारीच्या, त्याच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संलेखावर, त्याच्या विविध अनुच्छेदांअन्वये आकारण्यायोग्य असलेले मुद्रांक शुल्क, त्यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या खंड (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत, पुढील शर्तींस अधीन राहून, कपात किंवा माफ करीत आहे :—

**शर्ती :—**

(१) ज्या उपक्रमासाठी मुद्रांक शुल्कात कपात किंवा माफी देण्यात आली आहे असा कोणताही आयटी/आयटीइएस युनिट, तो उपक्रम सुरू करण्यात निष्फळ ठरल्यास किंवा त्याने, महाराष्ट्र राज्य आयटी/आयटीइएस धोरण, २०२३ याच्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास, ते युनिट, जणू काही, सुरुवातीपासून कोणतीही कपात किंवा माफी देण्यात आली नव्हती असे समजून, मुद्रांक शुल्क व शास्ती, कोणतीही असल्यास, प्रदान करण्यास पात्र असेल.

(२) या धोरणांतर्गत मुद्रांक शुल्कात सूट देण्याची मागणी करणाऱ्या आयटी/ आयटीइएस युनिटाच्या बाबतीत, विचाराधीन असलेल्या युनिटास, महाराष्ट्र शासनाने काढलेल्या इतर कोणत्याही धोरणांतर्गत मुद्रांक शुल्कात कोणतीही सूट उपलब्ध झाली आहे किंवा उपलब्ध झाली नाही किंवा कसे याची पडताळणी करणे आवश्यक असेल. या संबंधात, उद्योग विभागाच्या सक्षम प्राधिकरणाकडून मिळविलेले "ना-हरकत प्रमाणपत्र" सादर करणे अनिवार्य असेल.

(३) हा आदेश, **महाराष्ट्र शासन राजपत्रा**त प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापूर्वी, कोणत्याही आयटी/ आयटीइएस युनिटाने, अगोदरच संपूर्ण किंवा योग्य मुद्रांक शुल्क प्रदान केलेले असेल तर, त्या युनिटास, त्याचा परतावा देण्यात येणार नाही.

(४) या आदेशांतर्गत उपलब्ध असलेला मुद्रांक शुल्क माफीचा किंवा कपातीचा लाभ, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रक्षेत्रांमध्ये लागू आहे.

(५) ज्या आयटी/ आयटीइएस युनिटांना, या आदेशान्वये मुद्रांक शुल्क माफी किंवा कपात उपलब्ध झाली आहे अशी युनिटे, इतर कोणत्याही आदेशानुसार किंवा धोरणानुसार, त्याच व्यवहारासाठी मुद्रांक शुल्क माफीसाठी किंवा कपातीसाठी हक्कदार असणार नाहीत.

(६) ज्या आयटी/ आयटीइएस युनिटास, या आदेशानुसार मुद्रांक शुल्कात माफी किंवा कपात देण्यात आलेली आहे अशा, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये निर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांचा जे पक्षकार आहे आणि जे, उक्त आयटी/ आयटीइएस धोरण, २०२३ याच्या प्रयोजनाची किंवा उद्दिष्टांची पूर्तता करण्यात निष्फळ ठरले आहे किंवा ज्याने, या आदेशात निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केले आहे असे युनिट, जणू काही, मुद्रांक शुल्कात सुरुवातीपासून माफी किंवा कपात देण्यात आलेली नव्हती असे समजून, संपूर्ण मुद्रांक शुल्क व शास्ती, कोणतीही असल्यास, प्रदान करण्यास पात्र असेल.

(७) आयटी/ आयटीइएस धोरण-२०२३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या सक्षम प्राधिकरणाने, ज्या युनिटांना, या आदेशान्वये मुद्रांक शुल्क माफी किंवा कपात उपलब्ध झालेली आहे, परंतु जी युनिटे, आयटी/ आयटीइएस धोरणाचे प्रयोजन किंवा उद्दिष्टे यांची पूर्तता करण्यात निष्फळ ठरलेली आहेत, किंवा ज्या युनिटांनी, या आदेशात निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केले आहे अशा युनिटांची नावे व तपशील, मुद्रांक नोंदणी महासंचालक व नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविली पाहिजे.

(८) कोणतेही आयटी/आयटीइएस युनिट, ज्या जागेकरिता संबंधित नियोजन प्राधिकरणाकडून किंवा सक्षम प्राधिकरणाकडून बांधकाम सुरू करण्याचे वैध प्रमाणपत्र किंवा रेराची मान्यता मिळालेली आहे त्या जागेकरिताच केवळ, या आदेशान्वये मुद्रांक शुल्कात सूट मिळण्यास पात्र असेल.

(९) उत्पादन किंवा परिकर्म करणारे कोणतेही आयटी/ आयटीइएस युनिट, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थानांतरित झाले असेल आणि या युनिटाला यापूर्वीच मुद्रांक शुल्कात सूट उपलब्ध झाली असेल तर, ते युनिट, या आदेशान्वये मुद्रांक शुल्क माफीकरिता पात्र असणार नाही.

(१०) जर, कोणत्याही आयटी/ आयटीइएस युनिटाने, आयटी/ आयटीइएस या धोरणाच्या प्रारंभास किंवा त्यानंतर, आयटी/ आयटीइएस किंवा एव्हीजीसी उपक्रमामध्ये किंवा आधारसामग्री केंद्रामध्ये किंवा उदयोन्मुख तंत्रज्ञानामध्ये कमीत कमी २५ % इतके अतिरिक्त स्थिर भांडवल गुंतविले असेल तर, असे युनिट, विस्तारित किंवा वैविधीकरण युनिट म्हणून समजण्यात येईल आणि ते, या आदेशान्वये मुद्रांक शुल्क माफीकरिता पात्र असेल.

**स्पष्टीकरण.—**

(१) "महाराष्ट्र आयटी/ आयटीइएस धोरण, २०२३" याचा अर्थ, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक आयटीपी-२०२१/प्र.क्र.१७०/उद्योग-२, दिनांक २७ जून, २०२३ या अन्वये, शासनाने घोषित केलेले महाराष्ट्र आयटी/ आयटीइएस धोरण, २०२३, असा आहे.

(२) "आयटी/ आयटीईएस युनिट" याचा अर्थ, असे युनिट म्हणून सक्षम प्राधिकरणाने किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने अशाप्रकारे प्रमाणित केलेले, माहिती तंत्रज्ञान (आयटी युनिट) किंवा माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा युनिटे (आयटीइएस), आधार सामग्री केंद्रे, ॲनिमेशन, दृश्य प्रभाव, खेळ (गेमिंग) व चित्रकथा (कॉमिक्स) (एव्हीजीसी) व उदयोन्मुख माहिती तंत्रज्ञान युनिटे, असा आहे.

(३) या आदेशाद्वारे प्रदान केलेला मुद्रांक शुल्कातील कपातीचा किंवा माफीचा लाभ, उक्त आयटी/आयटीइएस धोरण,२०२३ याअन्वये पात्र असलेले आयटी/ आयटीइएस युनिट किंवा त्यानंतरचे युनिट यांच्यामध्ये निष्पादित केलेल्या भाडेपट्ट्याच्या किंवा अभिहस्तांतरणपत्राच्या किंवा भाडेपट्टा हक्काच्या अभिहस्तांकनाच्या किंवा विक्री प्रमाणपत्राच्या मार्गाने संपादन केलेल्या जमिनीच्या किंवा कोणत्याही प्रकारच्या जंगम किंवा स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणाच्या संलेखाला किंवा दस्तऐवजांना, लागू असणार नाही.

(४) उक्त आयटी/आयटीइएस धोरण, २०२३ अन्वये पात्र असलेले आयटी/आयटीइएस युनिट आणि त्यानंतरचे युनिट किंवा पुढील युनिट यांच्यामधील नंतरचा व्यवहार, या आदेशान्वये मुद्रांक शुल्क माफीसाठी किंवा कपातीसाठी पात्र असणार नाही. असा युनिट ते युनिट व्यवहार, या आदेशान्वये मुद्रांक शुल्कातील माफीसाठी किंवा कपातीसाठी पात्र असणार नाही.

(५) यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये वापरलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, "महाराष्ट्र आयटी/आयटीईएस धोरण, २०२३" या अन्वये नेमून दिलेले अर्थ असतील.

## अनुसूची

| अनुक्रमांक<br>(१) | प्रकल्प/उद्योग/युनिटे यांचा प्रकार व प्रक्षेत्र<br>(२) | माफीची मर्यादा<br>(३) | अधिनियमाच्या अनुसूची एकच्या अनुच्छेदांखालील संलेखांचा प्रकार<br>(४) |
|---|---|---|---|
| १. | नवीन आयटी/आयटीइएस युनिटे, एव्हीजीसी व उदयोन्मुख तंत्रज्ञान युनिटे आणि राज्याच्या प्रक्षेत्र एकच्या बाहेरील सार्वजनिक किंवा खाजगी आयटी पार्क्समधील विद्यमान युनिटांचा विस्तार. | १००% | तारणगहाण, तारण, ताबेगहाण, हक्क विलेखांचा निक्षेप (अनुच्छेद-६), अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद-२५), गहाण मालमत्तेवरील भार (अनुच्छेद-३३), भाडेपट्टा (अनुच्छेद-३६), गहाणखत (अनुच्छेद-४०) व गहाण खतावरील प्रतिभूती बंधपत्र (अनुच्छेद-५४). |
| २. | नवीन आयटी/आयटीइएस युनिटे, एव्हीजीसी व उदयोन्मुख तंत्रज्ञान युनिटे आणि राज्याच्या प्रक्षेत्र एक मधील सार्वजनिक आयटी पार्क्समधील विद्यमान युनिटांचा विस्तार. | ७५% | तारणगहाण, तारण, ताबेगहाण, हक्क विलेखांचा निक्षेप (अनुच्छेद-६), अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद-२५), गहाण मालमत्तेवरील भार (अनुच्छेद-३३), भाडेपट्टा (अनुच्छेद-३६), गहाणखत (अनुच्छेद-४०) व गहाण खतावरील प्रतिभूती बंधपत्र (अनुच्छेद-५४). |
| ३. | नवीन आयटी/आयटीइएस युनिटे, एव्हीजीसी व उदयोन्मुख तंत्रज्ञान युनिटे आणि राज्याच्या प्रक्षेत्र एक मधील खाजगी आयटी पार्क्समधील विद्यमान युनिटांचा विस्तार. | ५०% | तारणगहाण, तारण, ताबेगहाण, हक्क विलेखांचा निक्षेप (अनुच्छेद-६), अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद-२५), गहाण मालमत्तेवरील भार (अनुच्छेद-३३), भाडेपट्टा (अनुच्छेद-३६), गहाणखत (अनुच्छेद-४०) व गहाण खतावरील प्रतिभूती बंधपत्र (अनुच्छेद-५४). |

| अनुक्रमांक (१) | प्रकल्प/उद्योग/युनिटे यांचा प्रकार व प्रक्षेत्र (२) | माफीची मर्यादा (३) | अधिनियमाच्या अनुसूची एकच्या अनुच्छेदांखालील संलेखांचा प्रकार (४) |
|---|---|---|---|
| ४. | नवीन आयटी/आयटीइएस युनिटे, एव्हीजीसी व उदयोन्मुख तंत्रज्ञान युनिटे आणि विशेष आर्थिक प्रक्षेत्रातील आयटी पार्क्समधील विद्यमान युनिटांचा विस्तार, आयटी विशेष आर्थिक प्रक्षेत्रातील युनिटे व भारतीय सॉफ्टवेअर तंत्रज्ञान पार्कची मान्यताप्राप्त नोंदणीकृत युनिटे. | १००% | तारणगहाण, तारण, ताबेगहाण, हक्क विलेखांचा निक्षेप (अनुच्छेद-६), अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद-२५), गहाण मालमत्तेवरील भार (अनुच्छेद-३३), भाडेपट्टा (अनुच्छेद-३६), गहाणखत (अनुच्छेद-४०) व गहाण खतावरील प्रतिभूती बंधपत्र (अनुच्छेद-५४) आणि भाडेपट्ट्याचे अभिहस्तांकन (अनुच्छेद ६०). |
| ५. | संपूर्ण राज्यातील नोंदणीकृत आयटी/आयटीईएस युनिटांचे, एव्हीजीसीचे व उदयोन्मुख तंत्रज्ञान युनिटांचे विलीनीकरण, विलगीकरण व पुनर्रचना केल्यावर. | ७५% | विलीनीकरण, विलगीकरण व पुनर्रचना. (अनुच्छेद- २५ (डअ)), संमती-नि-परवाना करार (अनुच्छेद-३६अ) व भाडेपट्ट्याचे अभिहस्तांकन (अनुच्छेद-६०). |
| ६. | नवीन आधारसामग्री केंद्र स्थापन करण्यासाठी आणि राज्यभर त्याचा विस्तार करण्यासाठी आवश्यक असलेली जमीन/जागा खरेदी करण्यासाठी. | १००% | तारणगहाण, तारण, ताबेगहाण, हक्क विलेखांचा निक्षेप (अनुच्छेद- ६), अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद-२५), विलीनीकरण, विलगीकरण व पुनर्रचना (अनुच्छेद-२५ (डअ)), गहाण मालमत्तेवरील भार (अनुच्छेद-३३), भाडेपट्टा (अनुच्छेद-३६), संमती-नि-परवाना करार (अनुच्छेद-३६अ) व भाडेपट्ट्याचे अभिहस्तांकन (अनुच्छेद-६०), गहाणखत (अनुच्छेद-४०) आणि गहाण खतावरील प्रतिभूती बंधपत्र (अनुच्छेद-५४). |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सत्यनारायण बजाज,**
शासनाचे उप सचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mumbai 400 032, Dated 1st February 2024.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank-2023/UOR. No. 20/CR. 602/M-1 (Policy).—Whereas, the Government of Maharashtra has *vide* Government Resolution, Industries, Energy and Labour Department, No.ITP-2021/CR-170/Ind-2, dated the 27th June 2023, declared the New Information Technology and Information Technology Enabled Services Policy of Maharashtra State-2023 (hereinafter referred to as “the said IT/ITES Policy-2023”) ;

And Whereas under the said policy, the Government of Maharashtra has declared to provide *inter alia* fiscal incentives in the form of full or partial waiver of stamp duty for the eligible new and expansion or diversification units or projects related to Information Technology or Information Technology Enabled Services, Animation, Visual Effects, Gaming and Comics (AVGC) units, Data Centers and Emerging Technology Units, (hereinafter referred to as “the said IT/ITES Unit”) as mentioned in the said IT/ITES Policy-2023 ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as “the said Act”) the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby reduces or remits the stamp duty to the extent as specified in clause (3) of the Schedule appended hereto, chargeable under various Articles of the Schedule- I appended to the said Act, on the instruments specified in column (4) thereto of the eligible category of units or projects specified in column (2) thereof as per the said IT/ITES Policy-2023, for the period commencing on the 27th June 2023 and ending on the 26th June 2028 (inclusive of both days) or for the currency of the said IT/ITES Policy, subject to the following conditions, namely :—

***Conditions :—***

(1) Any IT/ITES Unit failing to start the activities for which the reduction or remission is granted or commits breach of any of the conditions of the Maharashtra State IT/ITES Policy, 2023 shall be liable to pay the stamp duty and penalty, as if, there was no reduction or remission from the beginning.

(2) For the IT/ITES unit seeking stamp duty exemption under this policy, it will be essential to verify whether the unit under consideration has availed or not availed any stamp duty exemption, under any other Policies of Government of Maharashtra issued in this behalf. It will be compulsory to submit ‘No Objection Certificate’ from the Competent Authority of Industries Department in this regard.

(3) No refund shall be granted where full or proper stamp duty has already been paid by any of the IT/ITES Units, prior to the date of publication of this Order in the *Maharashtra Government Gazette*.

(4) The benefit of stamp duty remission or reduction under this Order is applicable in the zones specified in the Schedule appended hereto.

(5) The IT/ITES Unit which has availed for the remission reduction of stamp duty under this Order shall not be entitled for remission or reduction of stamp duty for the same transaction as per any other Order or Policy.

(6) Any IT/ITES Unit who is party to the document specified in column (4) of the Schedule appended hereto for which the remission or reduction in the stamp duty is granted under this Order and who fails to fulfill the purpose or objectives of the said IT/ITES Policy-2023 or commits breach of any of the conditions as specified in this Order, shall be liable to pay the whole stamp duty and penalty, if any, as if there was no remission or reduction in stamp duty from the beginning.

(7) The Competent Authority as specified in the said IT/ITES Policy-2023 must convey to the Inspector General of Registration and Controller Stamps, Maharashtra State, Pune on regular basis the names and details of the units which have availed of remission or reduction of the stamp duty under this Order but has failed to fulfill the purpose or objectives of the said IT/ITES Policy-2023 or committed breach of any of the conditions specified in this Order.

(8) Any IT/ITES Unit will be eligible to avail stamp duty exemption under this Order only for the premises which has valid Commencement Certificate or RERA Approval from the concerned Planning Authority or Competent Authority.

(9) Any IT/ITES Unit in production or operation, shifting from one location to another and this unit had already availed of stamp duty exemption earlier, will not be eligible for stamp duty exemption under this Order.

(10) If any existing IT/ITES Unit makes minimum 25% additional fixed capital investment on or after commencement of this policy in IT/ITES or AVGC activity or DATA Center or Emerging Technology, such unit will be considered as expansion or diversification unit and it will be eligible for stamp duty exemption under this Order.

***Explanation.—***

(1) "The Maharashtra IT/ITES Policy, 2023" means the Maharashtra IT/ITES Policy, 2023 declared by the Government, *vide* the Government Resolution, Industries, Energy and Labour Department, No. ITP-2021/CR-170/Ind-2, dated the 27th June 2023.

(2) "IT/ITES unit" means the Information Technology Unit (IT Unit) or Information Technology Enabled Services Units (ITES Units), Data Centers, Animation, Visual Effects, Gaming and Comics (AVGC) and Emerging Technology Units so certified by the Competent Authority or any other officer authorized by it in this behalf, as such unit.

(3) The benefit of stamp duty reduction or remission provided by this Order shall not apply to the instrument or documents of transfer of acquired land or any type of movable or immovable property by way of lease or conveyance or assignment of lease rights or sale certificate executed between the eligible IT/ITES unit and the subsequent unit under the said IT/ITES Policy-2023.

(4) Further transactions between the eligible IT/ITES unit and the subsequent or the next unit under the said IT/ITES Policy-2023 shall not be eligible for the remission or reduction in the stamp duty under this Order. Thus unit to unit transaction shall not be eligible for stamp duty remission or reduction under this Order.

(5) The words and expressions used in column (2) of the Schedule appended hereto shall have the meanings assigned to them under "the Maharashtra IT/ITES Policy, 2023."

*SCHEDULE*

| **Sr. No.** (1) | **Type of project/industry/ units and Zone** (2) | **Extent of Remission** (3) | **Type of Instruments under Articles of the Schedule I of the Act** (4) |
|---|---|---|---|
| 1. | New IT/ITES Units, AVGC and Emerging Technology Units and expansion of existing units in Public or Private IT parks out of Zone I of the State. | 100% | Hypothecation, Pawn, Pledge, Deposit of Title Deeds (Article-6), Conveyance (Article-25), Charge on Mortgage Property (Article-33), Lease (Article-36), Mortgage Deed (Article-40) and Security Bond on Mortgage Deed (Article-54). |
| 2. | New IT/ITES Units, AVGC and Emerging Technology Units and expansions of existing units in Public IT parks in Zone I of the State. | 75% | Hypothecation, Pawn, Pledge, Deposit of Title Deeds (Article-6), Conveyance (Article-25), Charge on Mortgage Property (Article-33), Lease (Article-36), Mortgage Deed (Article-40) and Security Bond on Mortgage Deed (Article-54). |

| **Sr. No.** (1) | **Type of project/industry/ units and Zone** (2) | **Extent of Remission** (3) | **Type of Instruments under Articles of the Schedule I of the Act** (4) |
|---|---|---|---|
| 3. | New IT/TTES Units, AVGC and Emerging Technology Units and expansions of existing units in Private IT parks in Zone I of the State. | 50% | Hypothecation, Pawn, Pledge, Deposit of Title Deeds (Article-6), Conveyance (Article-25), Charge on Mortgage Property (Article.33), Lease (Article-36), Mortgage Deed (Article-40) and Security Bond on Mortgage Deed (Article-54). |
| 4. | New IT/ITES Units, AVGC and Emerging Technology Units and expansions of existing units in IT parks in Special Economic Zone, Units in IT Special Economic Zone and Software Technology Park of India approved registered units. | 100% | Hypothecation, Pawn, Pledge, Deposit of Title Deeds (Article-6), Conveyance (Article-25), Charge on Mortgage Property (Article-33), Lease (Article-36), Mortgage Deed (Article-40), Security Bond on Mortgage Deed (Article-54) and Assignment of Lease (Article-60). |
| 5. | On Merger, de-merger, and reconstruction of registered IT/ ITES units, AVGC and Emerging Technology Units throughout the State. | 75% | Merger, de-merger, and reconstruction. (Article-25 (da)), Leave and Licence Agreement (Article-36A) and Assignment of Lease (Article -60). |
| 6. | For purchasing land/ premises required for setting up a new data Center and for its expansion throughout the State. | 100% | Hypothecation, Pawn, Pledge, Deposit of Title Deeds (Article-6), Conveyance (Article-25), Merger, de-merger, and reconstruction (Article-25(da)), Charge on Mortgage Property (Article-33), Lease (Article-36), Leave and Licence Agreement (Article-36A), Assignment of Lease (Article-60), Mortgage Deed (Article-40) and Security Bond on Mortgage Deed (Article-54). |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN BAJAJ,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.